# <u>जाहीर लिलाव सूचना</u>

## मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, एस्प्लनेड, मुंबई—४००००१.

मुख्य न्यायदंडाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेअंतर्गत येणाऱ्या बॅलार्ड पिअर न्यायालयीन केंद्रामध्ये ०३ नग डायस, साक्षीदार कठडा ०३ नग, लाकडी कपाट ०१ नग यां वस्तूंचा जाहीर लिलाव दिनांक ०१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता करण्यात येणार आहे.

लिलावाच्या अटी व शर्ती:—

१. इच्छुक खरेदीदारांनी लिलावासाठी नाव नोंदणी करण्याकरिता लिलावाच्या निर्धारित वेळेच्या किमान अर्धा तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

२. निर्धारित वेळेनंतर उपस्थित राहणाऱ्या खरेदीदारांना सदर लिलावामध्ये सहभागी होणाची परवानगी दिली जाणार नाही.

३. सदर वस्तूंची लिलाव बोली लिलावाच्या दिवशीच निश्चित करण्यात येईल.

४. सर्वाधिक बोली लावणाऱ्या खरेदीदारास संबंधित वस्तू विकण्यात येतील.

५. लिलावामध्ये निश्चित झालेली वस्तूंची किंमत खरेदीदाराने त्याच दिवशी रोख स्वरूपात जमा करणे आवश्यक राहील.

६. लिलावामध्ये खरेदी केलेल्या वस्तू खरेदीदाराने स्वत:च्या खर्चाने व जबाबदारीवर घेऊन जाणे आवश्यक राहील.

७. सदर लिलावामध्ये सहभागी होणाऱ्या इच्छुक खरेदीदारांनी आवश्यक मूळ कागदपत्रांसह (आधार कार्ड, पॅन कार्ड) तसेच त्यांच्या छायांकित प्रतींसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

८. सदर लिलावासंदर्भातील सर्व अधिकार तसेच अंतिम निर्णय मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, मुंबई अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या मा. अधिकाऱ्यांकडे राहतील आणि त्यांचा निर्णय सर्व खरेदीदारांवर बंधनकारक राहील.

24/09/2026

मुख्य न्यायदंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई

दिनांक — २४ सप्टेंबर २०२६